28 DEC 2023 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अधिसभेत ठराव : पदवीसाठी येत्या शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी

# सहा झाडांचे रोपण-संगोपन सक्तीचे

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठाच्या पदवीसाठी यापुढे प्रत्येक विद्यार्थ्याला किमान सहा झाडे लावून त्यांचे संगोपन करणे अनिवार्य असेल. अधिसभा सदस्यांच्या बैठकीत हा ठराव एकमताने स्वीकृत झाला आहे. याबाबतचा अहवाल प्रत्येक विद्यार्थ्याला लावलेल्या रोपाचे 'जिओ टॅगिंग' करून ते महाविद्यालयाच्या स्वतंत्र कक्षाकडे अपलोड करावे लागेल. त्यासाठी महाविद्यालयात पर्यावरण अधिकारी नियुक्त करून त्याच्यावर या निर्णयाची जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली अधिसभा सदस्यांची नुकतीच बैठक झाली. तीत सदस्यांनी विविध ठराव मांडले होते. त्यापैकी डॉ. मनोज पाटील यांच्याकडून मांडलेला ठराव क्रमांक ५५ स्वीकृत झाला आहे. त्यानुसार तीन वर्षांच्या पदवी काळात दरवर्षी दोनप्रमाणे विद्यार्थ्यांनी त्यांच्या परिसरात झाडे लावणे अनिवार्य केले आहे. या झाडांना कुंपण घालून त्याची नियमित देखभाल करावी. त्या वृक्षारोपणाचे 'जिओ टॅगिंग' करून तो फोटो-व्हिडिओयुक्त अहवाल सादर करावा लागेल. श्री. पाटील यांनी ठराव क्रमांक २० मांडला आहे. त्यात विद्यापीठातील सर्वच कार्यक्रम पर्यावरणपूरक शैलीत-पद्धतीतच व्हावेत. विद्यापीठात होणाऱ्या विकासकामांचे पर्यावरण संरक्षणाच्या मुद्द्यांना अनुसरून मूल्यांकन व्हावे. एकूणच, पर्यावरण जागृती व परिस्थिती परिवर्तनासाठी काही प्रयत्न व्हावेत. यासाठी अल्प व दीर्घकालीन योजना राबवाव्यात, त्यासंबंधीची मार्गदर्शक तत्त्वे व त्यांचे पर्यवेक्षण व्हावे. यासाठी विद्यापीठ स्तरावर एक सर्वसमावेशक पर्यावरण संरक्षण समितीची स्थापना करण्यात यावी, असा ठराव मांडला होता. त्यालाही एकमताने स्वीकृती मिळाली आहे. या ठरावांना सूचक संजय परमणे, अनुमोदक डॉ. प्रशांत खरात आहेत. या ठरावाला ॲड. अभिषेक मिठारी, अमित जाधव, रतन कांबळे, घनःश्याम दीक्षित, श्वेता परुळेकर, डॉ. उषा पवार यांनी समर्थन दिले. एकूणच, पर्यावरण जनजागृतीच्या दृष्टीने या दोन्ही ठरावांचे महत्त्व आहे.

२००१ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे सर्व पदवी अभ्यासक्रमांत, सर्व विद्याशाखांना पर्यावरण हा विषय अनिवार्य केला आहे. सर्वत्रच या निर्णयानुसार अंमलबजावणी सुरूही आहे. दुसऱ्या वर्षाला सर्वत्र पर्यावरण विषय अनिवार्यही केला केला आहे. तथापि, तो दुय्यम विषय राहिल्याने त्याचे मूल्यांकन श्रेणीत व्हायचे. गुण नसल्याने शिक्षक आणि विद्यार्थी त्याला महत्त्व देत नव्हते. शासन या विषयासाठी अनुदानित पदेच दिलेली नाहीत. महाविद्यालयातील प्राध्यापकांकडेच याबाबतची जबाबदारी असते. तासिका तत्त्वावर या विषयासाठी नियुक्त केलेल्या शिक्षकाचे वेतनही महाविद्यालयाकडूनच केले जातात. याकडे डॉ. मनोज पाटील यांनी राज्यपाल तथा कुलपतींचे लक्ष वेधले आहे. आता शिवाजी विद्यापीठ स्तरावर पदवीच्या प्रत्येक वर्षी वृक्षारोपण व संगोपनाची सक्ती 'जिओ टॅगिंग'द्वारे केल्याने पदवी प्रमाणपत्रच मिळण्यासाठी वृक्षारोपणाचा, संगोपनाचा अहवाल दरवर्षीच्या परीक्षेवेळी द्यावा लागणार आहे.



> असा ठराव नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाने केला आहे. झाडे कोणती आणि कोठे लावावीत, याबाबत आता विद्यापीठाच्या पर्यावरण संरक्षण समिती स्तरावर नियम ठरवावे लागतील. यासाठी राष्ट्रीय सेवा योजना समिती, छात्रसेना, राष्ट्रीय छात्रसेना, भूगोल, पर्यावरण, वनस्पतीशास्त्र अशा विभागांचे सहकार्य घेता येईल. वैयक्तिक शेतीत, शहर-गावातील सार्वजनिक जागांची निवड करता येईल. लवकरच ठरावाच्या अंमलबजावणीबाबतची प्रक्रिया सुरू होईल.
> **- डॉ. मनोज पाटील,** अधिसभा सदस्य

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 DEC 2023
पुण्यनगरी

# विद्यापीठात डॉ.पंजाबराव देशमुख यांची जयंती

**कोल्हापूर :** महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते डॉ.पंजाबराव देशमुख यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र- कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी वनस्पतीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. राजाराम गुरव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, बॅ. बाळासाहेब ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, डॉ. दत्तात्रय गायकवाड, डॉ. वर्षा जाधव, डॉ. मनोज लेखक, डॉ. सावळीराम घाणे, डॉ. सचिन पाटील, अभिजीत पार्टे, हर्षल व्हटकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2023
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी

कोल्हापूर : महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी वनस्पतिशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. राजाराम गुरव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, डॉ. दत्तात्रय गायकवाड, डॉ. वर्षा जाधव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2023
पुढारी

# सायबरच्या स्वरूपा घागची विद्यापीठ बास्केटबॉल महिला संघात निवड



कोल्हापूर : सायबर ट्रस्ट संचलित, कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेन्शनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वूमेन महाविद्यालयातील स्वरूपा घाग हिची आय. टी. एम. विद्यापीठ, ग्वालियर येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठच्या बास्केटबॉल महिला संघात निवड झाली आहे. तिला शारीरिक शिक्षण संचालक रामेश्वरी गुंजीकर आदी मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. ए. आर. कुलकर्णी, संस्थेचे सेक्रेटरी डॉ. आर. ए. शिंदे यांनी तिचे अभिनंदन केले. तिच्या निवडीबद्दल सर्व स्तरांतून तिचे अभिनंदन होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2023
लोकमत

# मल्लखांबमध्ये शिवाजी विद्यापीठाला सुवर्णपदक

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : जयपूर येथील सुरेश ज्ञानविहार विद्यापीठ येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मल्लखांब मनोरा स्पर्धेत शिवाजी विद्यापीठातील महिला व पुरुष संघाने सुवर्णपदक पटकावले.

विजयी संघात वैष्णवी मोरे (वारणा महाविद्यालय, वारणा), अस्मिता मांढरे (वारणा महाविद्यालय), समीक्षा गावडे (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज), प्राजक्ता गावडे (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज), निशा मोळके (अण्णासाहेब डांगे महाविद्यालय, हातकणंगले), पल्लवी मोरे (डी. जी. कॉलेज, सातारा), दर्षण मिनियार (वारणा महाविद्यालय), शुभम लगड (वारणा महाविद्यालय), कुणाल दरवान (वारणा महाविद्यालय), ओंकार कबुले (केआयटी महाविद्यालय, कोल्हापूर) यांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2023
पुण्यनगरी

# मल्लखांबमध्ये शिवाजी विद्यापीठास सुवर्ण

**कोल्हापूर :** सुरेश ज्ञान विहार विद्यापीठ जयपूर, राजस्थान येथे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मल्लखांब स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शिवाजी विद्यापीठ महिला व पुरुष या दोन्ही संघांनी मल्लखांब मनोरा स्पर्धेमध्ये सुवर्णपदक पटकावले. या दोन्ही संघाची गुवाहाटी आसाम विद्यापीठ खेलो इंडिया स्पर्धेसाठी निवड झाली आहे. महिलांच्या विजयी संघामध्ये वैष्णवी मोरे (वारणा महाविद्यालय, वारणा), अस्मिता मांढरे (वारणा महाविद्यालय, वारणा), समीक्षा गावडे (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज), प्राजक्ता गावडे (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज), निशा मोळके (अण्णासाहेब डांगे महाविद्यालय, हातकणंगले), पल्लवी मोरे (डी. जी. कॉलेज सातारा), तर पुरुष संघामध्ये दर्शन मणीयार, शुभम लगड, कुणाल दरवान (सर्व वारणा महाविद्यालय, वारणा), ओंकार कबुले (केआयटी महाविद्यालय) यांचा समावेश होता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2023
पुण्यनगरी

# विद्यापीठ फुटबॉल संघात आविष्कार राऊत

**कोल्हापूर :** दि. २९ डिसेंबर, २०२३ ते २ जानेवारी, २०२४ या कालावधीत मुंबई येथे वेस्ट झोन फुटबॉल स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेसाठी डॉक्टर तानाजीराव चोरगे वरिष्ठ विद्यालय, नंदवाळ या कॉलेजचा फुटबॉल खेळाडू आविष्कार जयसिंग राऊत ( बीसीए प्रथम वर्ष) याची निवड शिवाजी विद्यापीठ फुटबॉल संघामध्ये झाली आहे. आविष्कार केएसए सिनियर फुटबॉल लीगमध्ये बीजीएम या संघाचे नेतृत्व करत आहे. या खेळाडूस संस्थेचे चेअरमन डॉ. तानाजीराव चोरगे, डॉ. निखिल चोरगे, महादेव इंगवले, प्राचार्य कानिटकर, प्रा. केतन आडनाईक आदींचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2023
पुण्यनगरी

# सृष्टी हुलसार हिची निवड



गडहिंग्लज : येथील शिवराज महाविद्यालयाची खेळाडू सृष्टी हुलसार हिची शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथून ग्वाल्हेर (मध्यप्रदेश) येथे होत असलेल्या राष्ट्रीय महिला फुटबॉल संघात निवड झाली आहे. यासाठी तिला संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसन कुराडे, सचिव डॉ. अनिल कुराडे, प्राचार्य एस. एम. कदम यांचे प्रोत्साहन तर गणपती हुलसार यांचे मार्गदर्शन लाभले.